# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११९ इ-मेल: directorcrs78@gmail.com


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/295/२०२३ दि. 6/6/२०२३

### निविदा सूचना

**विषय:- सन २०२३-२४ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत पश्चिम विभागावर नवीन फळबागेकरिता शेणखत खरेदी करण्याकरिता निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत पश्चिम विभागावर नवीन फळबागेकरिता शेणखत खरेदी करण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.

३. निविदा सादर करतेवेळी दर हे जीएसटी व सर्व करासह नमूद करावे.

४. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामे करीत असतांना पिकाचे/फळबागेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

५. प्रक्षेत्रावरील विभागावर शेणखत उतरविण्यापर्यंत कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

६. विभागावर शेणखत उत्तरविण्याचे काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

७. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारकास बंधनकारक राहील.

८. निविदाधारकाने देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

९. या कार्यालयातर्फे निविदाधारकास सदर काम करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य/मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही, आवश्यक साहित्य/मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

१०. निविदाधारक/कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

११. प्रक्षेत्रावरील विभागावर सदर कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१२. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **१६.०६.२०२३** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक

मध्यवर्ती संशोधन केंद्र

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा/कोटेशन

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत पश्चिम विभागावर नविन फळबागे करिता शेणखत खरेदी करावयाचे असुन त्यांचे प्रति क्विंटल दर खालील प्रमाणे सादर करावे.

| अ. क्र. | शेणखत | दर प्रति क्विंटल (रु) | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | कुजलेले शेणखत विभागावरील शेतामध्ये उतरविण्यासह | | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक:

स्वाक्षरी

नाव व संपूर्ण पत्ता